ऐक्य

गुरुवार ६/०५/२०२१ अंक १८८ ४ ₹ पाने ८

चैत्र कृ. १० शके १९४३ नक्षत्र शततारका

# सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठास मान्यता

▲ सातारा, दि. ५ : 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' असणाऱ्या रयत शिक्षण संस्थेचे स्वतंत्र विद्यापीठ असावे, हे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे १०० वर्षापूर्वी पाहिलेले स्वप्न आता साकार होत आहे. या संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय या तिन्ही नामांकित महाविद्यालयांचे एकत्रित कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठास मंत्रिमंडळाच्या बैठकीत तत्त्वतः मान्यता दिली गेली. कर्मवीर अण्णांची इच्छा फलद्रूप होत असल्याचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी सांगितले.

स्वातंत्र्यपूर्व काळात वंचित, बहुजनांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आयुष्य खर्ची घालणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वटवृक्षाचे रोपटे लावले. सर्वांना चांगले शिक्षण मिळावे, स्वावलंबी शिक्षण असावे, कमी खर्चात शिक्षण घेता यावे, यासाठी रयत शिक्षण संस्थेचे स्वतंत्र विद्यापीठ असेल तर सर्व काही शक्य होईल, असे स्वप्न कर्मवीर अण्णांनी १०० वर्षापूर्वी पाहिले होते. तशी इच्छा जाहीर प्रकट केली होती.हे स्वप्न सत्यात साकारण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष शरद पवार आणि मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, जनरल बॉडीचे सदस्य अव्याहत प्रयत्नशील होते. शासनाकडे त्यासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया पूर्ण करून मान्यतेसाठी पाठपुरावा केला जात होता.तशी स्वतंत्र विद्यापीठाची सुरुवात म्हणून सध्या सातारा येथील गुणवत्ता,व्यवस्थापन आणि नॅक मानांकित सर्वोत्तम असणाऱ्या छत्रपती शिवाजी कॉलेज, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयचे एकत्रित (पान ७ पहा)

## सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठास मान्यता

अशा कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठास शासनाने बुधवार, दि.५ मे रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता दिली आहे. यामुळे रयत शिक्षण संस्थेचा सर्वदूर असलेला लौकिक अधिक गडद झाला आहे.

याबाबत संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी, रयत शिक्षण संस्थेची स्थापना करताना कर्मवीर अण्णांनी बहुजनांच्या मुलांना शिक्षण घेता यावे.ते शिक्षण कमी खर्चात आणि सर्वोत्तम असावे,यासाठी रयतची स्थापना केली. तेव्हापासून या संस्थेचे ग्रामीण विद्यापीठ असावे, ही इच्छा होती. आज विद्यापीठाकडे वाटचाल सुरू करणारे तीन महाविद्यालयांचे एकत्रित समूह विद्यापीठास मंत्रिमंडळाकडून मान्यता मिळाली आहे. संस्थेचे अध्यक्ष आणि सर्व पदाधिकाऱ्यांचे यासाठी महत्त्वपूर्ण योगदान असून भविष्यात संस्थेच्या शिक्षणाच्या आधुनिक तंत्रज्ञान, व्यवसाय शिक्षणाच्या कक्षा अधिक रुंदावतील, असे सांगितले.

# 'रयत'च्या प्राध्यापकांनी लिहिलेल्या कोरोनायन पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात

▲ सातारा, दि. ५ : गेले दीड वर्ष ज्या कोविड १९ या जागतिक महामारीमुळे जगभर जीवित व वित्तहानी सुरू आहे. त्याचा वास्तवस्पर्शी लेखाजोखा मांडणाऱ्या डॉ. अनिलकुमार वावरे व प्रा. किशोर सुतार लिखित 'कोरोनायन' या संदर्भग्रंथाचे प्रकाशन रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्रिं.डॉ.विठ्ठल शिवणकर यांच्या हस्ते नुकतेच ऑनलाईन झाले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य प्रो.डॉ.जे.एफ.पाटील उपस्थित होते. या ग्रंथ लेखनामागील भूमिका व उद्देश प्रा.किशोर सुतार यांनी आपल्या प्रास्ताविकातून स्पष्ट केला. कोरोनाच्या सर्व आयामांनी वेध घेणारा मराठी भाषेतील संदर्भग्रंथ कोरोनायनच्याद्वारे मराठी वाचक व अभ्यासकांसाठी दिला जात आहे.

डॉ.जे.एफ.पाटील सरांनी लेखकांना शुभेच्छा देवून लेखक कसा असावा, तो सतत वाचणारा, लिहणारा, चिंतनशील असावा. यादृष्टीने रयत शिक्षण संस्था आपल्या शिक्षकांना अशा कार्यासाठी लागणारे वातावरण, पायाभूत सोई-सुविधा देणारी असल्याचे म्हटले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्रिं.डॉ.शिवणकर म्हणाले, डॉ.अनिलकुमार वावरे व प्रा.किशोर सुतार या लेखकद्वयींनी लिहिलेल्या कोरोनायन या ग्रंथासाठी लेखकांनी घेतलेले परिश्रम ग्रंथाच्या पानापानात दिसून येते.

प्रकाशन सोहळ्यासाठी रयतचे माजी सचिव प्रिं.डॉ.जे.जी.जाधव, सहसचिव प्राचार्या डॉ.प्रतिभा गायकवाड, ऑडिटर प्रिं.डॉ.शिवलिंग मेनकुदळे हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने प्राध्यापक उपस्थित होते.

प्राचार्य